# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे — ४११००७

## Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


### परिपत्रक क्र.७१९/२०२६

**विषयः— ''तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफी, प्रवेश प्रक्रियेत ''तृतीयपंथी'' लिंग पर्यायाचा समावेश व तृतीयपंथी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.''**

या परिपत्रकाद्वारे सर्व मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख/मा. संचालक सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विभाग, मुंबई शासन परिपत्रक क्र. संकीर्ण—२०२६/ई—१५६४७०२/विशि—३, दि. ४ मार्च, २०२६ अन्वये तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात समान संधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफी, प्रवेश प्रक्रियेत ''तृतीयपंथी'' लिंग पर्यायाचा समावेश व तृतीयपंथी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सोबत सदर परिपत्रकाची प्रत जोडली आहे.

सबब, 'मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख/मा. संचालक सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग' यांनी वरिल शासन परिपत्रकामधील मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करावी, ही विनंती.

(राजेश राहेरकर)
उपकुलसचिव,

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/३५८६
दिनांक :२१/०८/२०२६

**प्रत:**

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख/मा. संचालक सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग यांना विनंती की, या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून दयावा.

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 1618
दिनांक : 13.03.2026
जावक दिनांक : 14.03.2026
विभाग :

Registrar

**तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफी, प्रवेश प्रक्रियेत "तृतीयपंथी" लिंग पर्यायाचा समावेश व तृतीयपंथी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.**

914

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 12 MAR 2026
आवक क्रमांक 1405
जावक दिनांक 12 MAR 2026

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२६/ई-१५६४७०२/विशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

४ था मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

दिनांक: ०४ मार्च, २०२६

- Dir. BEE
- DR. P.G.

Ph.D./M.Phil Uni 1513
Inward No.
Date : 14/03/2026

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

२. तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९

३. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग यांच्या दिनांक १५.०९.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना

४. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३, शिकाना, दि. ०७.१२.२०२३

५. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. तृतीय-२०२३/प्र.क्र.१२२/सामासु, दि.११.०३.२०२४

६. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ (भाग-२), शिकाना, दि. १५.०३.२०२४

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७ (३) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

*"विद्यापीठ, राज्य शासनाकडून वेळोवेळी निदेश देण्यात येईल त्यानुसार, समाजाच्या दुर्बल घटकांतील विविध प्रवर्ग, अल्पसंख्याक, महिला व दिव्यांग व्यक्ती यांच्या कल्याणासंबंधात राज्य शासनाच्या सर्वसाधारण धोरणांचे अनुपालन करील. त्याचप्रमाणे अधिनियमातील कलम ५ (५९) नुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या वर्गांना व जाती जमातींना विद्यापीठातील शिक्षणाचे लाभ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष तरतुदी करणे हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे."*

तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ मधील कलम ३ मध्ये कोणत्याही व्यक्ती किंवा संस्था तृतीयपंथीय व्यक्तीविरुद्ध पुढील कारणांवरून भेदभाव करणार नाही असे नमूद केले आहे.

*"शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश नाकारणे, शिक्षणाची सातत्यपूर्ण सुविधा न देणे किंवा त्यामध्ये अन्यायकारक वागणूक देणे."*

उपरोक्त बाबी विचारात घेऊन संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना या विभागाच्या अधिपत्याखालील शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक फी (शैक्षणिक

शुल्क) विद्यापीठाच्या स्वनिधीतून भरण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या स्वनिधीतून भरण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये तृतीयपंथीयांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र राज्याचे तृतीयपंथीयांसाठीचे धोरण-२०२४ जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे तसेच, उच्च शिक्षण संस्थांमध्ये महाराष्ट्र राज्याचे तृतीयपंथीयांसाठीचे धोरण-२०२४ च्या अनुपालनासंदर्भातील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, संदर्भ क्र. ४ व ६ येथील सूचनांचे पालन विद्यापीठ व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८ (७) मध्ये नमूद केल्यानुसार *विद्यापीठाने त्यांचे अधिकार व कर्तव्ये अनुक्रमे वापरण्यास व पार पाडण्यास विद्यापीठाने कसूर केली असेल त्याबाबतीत किंवा विद्यापीठाने असे अधिकार व कर्तव्ये समुचितरीतीने अनुक्रमे वापरलेले किंवा पार पाडलेली नसतील किंवा राज्य शासनाने काढलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन केलेले नसेल, किंवा राज्य शासनाला योग्य वाटेल अशा कोणत्याही परिस्थितीअन्वये त्याबाबतीत, राज्य शासन विद्यापीठास अशा अधिकारांचा योग्य वापर करण्याचा किंवा अशी कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्याचा किंवा आदेशाचे पालन करण्याचा निदेश देता येईल व अशा निदेशाचे पालन करणे हे विद्यापीठाचे कर्तव्य असेल.* अधिनियमातील सदर तरतुदीस अनुसरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील सर्वसमावेशक शिक्षण पद्धती व समानता या मुद्यांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफी, प्रवेश प्रक्रियेत "तृतीयपंथी" पर्यायाचा समावेश व तृतीयपंथी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व सार्वजनिक विद्यापीठांना पुनःश्च सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक:-

तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात समान संधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफी, प्रवेश प्रक्रियेत "तृतीयपंथी" लिंग पर्यायाचा समावेश व तृतीयपंथी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व सार्वजनिक विद्यापीठांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. एखादा विद्यार्थी केवळ तृतीयपंथी आहे या कारणावरून विद्यापीठात तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात येऊ नये.
२. शासन निर्णय, दि. ०७.१२.२०२३ मधील सूचनांनुसार तृतीयपंथी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक शुल्क आकारण्यात येऊ नये.

३. तृतीयपंथी व्यक्तींना शिक्षणाचा प्रवेश सुलभ व निर्बंधमुक्त व्हावा यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत. सर्व प्रकारचे प्रवेश अर्ज/नोंदणी फॉर्ममध्ये "पुरुष/स्त्री" सोबत "तृतीयपंथी" हा स्वतंत्र लिंग पर्याय समाविष्ट करण्यात यावा.
(पुरुष/स्त्री/तृतीयपंथी याप्रमाणे)

४. शैक्षणिक संस्थांमध्ये तृतीयपंथी विद्यार्थ्यांवर होणारे हिंसाचार, भेदभाव किंवा छळ रोखण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांना विद्यापीठांनी स्पष्ट सूचना द्याव्यात. तसेच, सर्व विद्यापीठांनी तृतीयपंथी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या छळ, त्रास किंवा हिंसाचारापासून संरक्षण द्यावे.

५. शासन निर्णय, दि. ०७.१२.२०२३ व १५.०३.२०२४ मधील मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना विद्यापीठांनी त्यांच्या संलग्न महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे द्याव्यात. तसेच, या सूचनांची संलग्नित महाविद्यालयांमध्ये अंमलबजावणी होते किंवा कसे याचा नियतकालीक आढावा घ्यावा व नियतकालिक आढाव्याची नोंद विद्यापीठांनी त्यांच्या वार्षिक अहवालात घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०३०४१८१७४२१६०८ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAP PANDURANG LUBAL

(प्रताप पां. लुबाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला शिक्षण, पुणे/मुंबई,
११. सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
१३. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
१४. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई,
१५. निवडनस्ती (विशि-३)